मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तळवडेतील आगीत सहा जणांचा मृत्यू

## जखमींवर ससून रुग्णालयात उपचार सुरु

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

ज्योतिबा नगर, तळवडे येथे प्लॉट नंबर २५२ मध्ये केकवर लावल्या जाणाऱ्या स्पार्कल्स बनवणाऱ्या कारखान्यात शुक्रवारी (दि. ८) दुपारी पावणे तीन वाजताच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात सहा महिला कामगारांचा होरपळून जागीच मृत्यू झाला. तर दहाजण जखमी झाले. जखमींवर ससून रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यातील काहींची प्रकृती अतिशय नाजूक आहे. शिल्पा राठोड (वय ३१), प्रतिक्षा तोरणे (वय १६), अपेक्षा तोरणे (वय २६), कविता राठोड (वय ४५), रेणुका ताथोड, (वय २०), शरद सुतार (वय ४५), कोमल चौरे (वय २५), राधा उर्फ सुमन यादव (वय ४०), उषा पाडवे (वय ४०) आणि प्रियंका यादव (वय ३२) अशी जखमींची नावे आहेत. मृत्यू झालेल्या महिला कामगारांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे.



तळवडे येथे राणा इंजिनिअरिंग या कंपनीच्या आवारात असलेल्या एका गोडाऊनमध्ये केकवर लावल्या जाणाऱ्या स्पार्कल्स बनवल्या जात होत्या. या स्पार्कल्समध्ये काही प्रमाणात दारू वापरली जाते. नेहमीप्रमाणे कारखान्यात काम करणाऱ्या महिला शुक्रवारी सकाळी कामावर आल्या. कारखान्यात काम करत असताना अचानक स्फोट झाला. या स्फोटाच्या हादऱ्याने कारखान्याचे शटर बंद झाले. दरम्यान, कारखान्याचे शटर बंद करूनच काम केले जात असल्याचे उघड झाले आहे.स्फोटाच्या आवाजाने शटर झाकले गेले. स्फोटकाचा मोठ्या प्रमाणात उग्र धूर झाला. आग आणि धूर यामध्ये कोंडमारा होऊन होरपळून सहा महिला कामगारांचा जागीच मृत्यू झाला. तर एक पुरुष आणि नऊ महिला गंभीर जखमी झाल्या. घटना घडल्यानंतर काही वेळाने स्थानिक नागरिकांनी रुग्णवाहिकेची वाट न पाहता महिलांना एका टेम्पोत घालून तात्काळ पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात पाठवले. दुपारी तीन वाजता अग्निशमन विभागाला घटनेची माहिती मिळाली. त्यानुसार अग्निशमन विभागाचे सहा बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी कारखान्याच्या पाठीमागील बाजूची भिंत फोडून आतमध्ये पाणी मारून आगीवर नियंत्रण मिळवले.

स्फोटाच्या धक्क्याने कारखान्याच्या भिंतीला तडे गेले आहेत. त्यावरून या स्फोटाची आणि एकूणच घटनेची भीषणता व्यक्त केली जात आहे. त्यानंतर महापालिका आयुक्त शेख सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी घटनेची माहिती घेऊन जखमींवर योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या. आगीची घटना घडल्यानंतर ज्योतिबा नगर येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. वाहतुकीचा अडथळा येऊ नये यासाठी वाहतूक शाखेचे पोलीस आयुक्त बापू बांगर स्वतः घटनास्थळी आले. त्यांनी वाहतूक नियमन करण्यासाठी मदत करत वाहतूक सुरळीत केली. परंतु एरवी देखील या रस्त्यावर वाहतूक कोंडी नित्याची आहे. या घटनेमुळे त्यात आणखी भर पडली. याचा फटका अग्निशमन दलाचे बंब आणि रुग्णवाहिका यांना बसला. घटनास्थळावरून निघालेल्या रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकल्या. वाहतूक पोलिसांनी रुग्णवाहिकांना रस्ता करून देण्यात आला. जखमी रुग्णांमध्ये एका १६ वर्षीय मुलीचाही समावेश आहे. ही मुलगी ९० ते ९५ टक्के भाजली आहे. चार महिला ७० टक्क्यांहून अधिक भाजल्या आहेत. तर तीन महिला ४० ते ४५ टक्के भाजल्या आहेत. यातील काही जणांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर तातडीचे उपचार सुरु आहेत. मात्र, दुर्दैवाने या घटनेत मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जखमींना वायसीएम रुग्णालयातून ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथल्या सर्व प्रक्रियेत मदत करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पोलिसांचे एक पथक ससून रुग्णालयात तैनात केले आहे. त्यामध्ये हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि १० कर्मचारी यांचा समावेश आहे. तळवडे येथे घडलेल्या घटनेची दाहकता प्रचंड होती. स्फोट होऊन सहा कामगारांचा मृत्यू झाल्याने इथे नागरिकांनी एकच गर्दी केली.

# भाजपा युवा मोर्चाच्या वतीने प्रियांक खर्गे यांचा निषेध!

## कठोर कारवाई करण्याची भाजपा युवा मोर्चाची मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

कर्नाटक राज्यातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांचे चिरंजीव प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे बदनामी करण्याच्या हेतूने बेताल व्यक्तव्य केल्याप्रसंगी अनेकांचे मन दुखावल्याचे निर्दशनास आले असल्याने पिंपरी चिंचवड शहर जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा सर्व




पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने आज पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी यासाठी वरिष्ठांकडे मागणी करण्यात आली.

याप्रसंगी भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष मा.तुषार हिंगे, अजित कुलथे, दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, गणेश संभेराव, सुधीर साळुंखे, सचिन बंदी, उमेश सांडभोर, युवराज ढोरे, सनी बारणे, गौरव शिरोदे, अनिकेत शेलार, मोहन राऊत, प्रिया पवार, यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. मल्लिकार्जुन खर्गे यांचे चिरंजीव प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे बदनामी करण्याच्या हेतूने बेताल व्यक्तव्य केल्याप्रसंगी अनेकांचे मन दुखावल्याचे निर्दशनास आले असल्याने पिंपरी चिंचवड शहर जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

# नदी प्रदूषणाबाबत पालिकेला पुन्हा नोटीस

## पुढील पंधरा दिवसात सुधारात्मक कृती आराखडा सादर करण्याचे आदेश

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** वना, मुळा व इंद्रायणी नद्यांच्या प्रदूषणास जबाबदार असल्याच्या कारणावरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पिंपरी- चिंचवड महापालिकेला पुन्हा नोटीस बजावली आहे. पालिकेला पुढील पंधरा दिवसात सुधारात्मक कृती आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.




शहरातील नदी प्रदूषणाबाबत कृषी, पर्यावरण, शिक्षण आणि नागरी समस्यांचे निवारण संघटनेचे अध्यक्ष सूरज बाबर आणि पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे लेखी तक्रार केली होती. प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्या पालिकेवर कारवाईची मागणी केली होती. त्याची दखल घेत प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी रवींद्र आंधळे यांनी पालिकेला नोटीस बजावली. नद्यांमध्ये प्रक्रिया न केलेले सांडपाणी, औद्योगिक सांडपाणी ठपका ठेवला आहे. त्यामुळे नद्यांची गुणवत्ता ढासळत असल्याचे स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांनी पाहणी केलेल्या स्थळांचे अहवाल देखील पालिकेला पाठवले आहेत. या अहवालानुसार रावेत एसटीपी केंद्राजवळ सांडपाणी थेट नदीत सोडले जास्त असल्याचे आढळून आले. यासह तळवडे भागात औद्योगिक सांडपाणी, चिखली, कुदळवाडी, मोशी या ठिकाणाहून नाल्यातील पाणी नदीत सोडल्याचे समोर आले. यामुळे नियमांचे उल्लंघन झाले असून पालिका प्रशासन जबाबदार असल्याचे म्हटले आहे. तसेच, पालिकेचे सहशहर अभियंता व जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई का करू नये, याचा प्रश्न खुलासा मागितला आहे. सुधारणा अहवाल सादर करण्याचे आदेशात म्हटले आहे.

> **“ पाणी प्रदूषणाबाबत महापालिकेकडून दुर्लक्ष केले जात आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. या प्रकरणाचा पाठपुरावा यापुढेही सुरु राहील.**
>
> **– सूरज बाबर, अध्यक्ष– कृषी पर्यावरण, शिक्षण आणि नागरी समस्या निवारण संघटना.**

---

# अग्निकांडस जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

## पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या आशीर्वादाने बऱ्याच ठिकाणी अनधिकृत कंपन्या

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिंचवडमधील तळवडे येथे आगीत होरपळून सहा जणांचा मृत्यू झाला. यावरून आता आरोप प्रत्यारोप होताना दिसत आहेत. पिंपरी- चिंचवड राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी अग्निकांडास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तळवडे येथे दुपारी तीन च्या सुमारास विनापरवाना फॅक्टरीमध्ये केकवर लावण्यात येणारे आतिश बाजी करणारे कॅण्डल बनवण्याचा उद्योग राजरोसपणे चालू होता.



आज या फॅक्टरीमध्ये भीषण अशी आग लागली व त्या आगे मध्ये होरपळून सहा कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच, काही जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या आशीर्वादाने बऱ्याच ठिकाणी आशा अनधिकृत कंपन्या चालवल्या जातात. अग्निशामन विभागातर्फे देखील कोणाचेही या गोष्टींवर नियंत्रण नाही. छोटे- छोटे फटाका व्यवसाय रस्त्यावर फटाका विकताना ज्या परवानग्या काढल्या जातात त्यामध्ये प्रचंड अशी मानसिक आणि आर्थिक पिळवणूक त्या गोरगरीब होतकरू तरुणांची होत असते. परंतु, अशा प्रकारे अनाधिकृत फटाक्यांच्या कारखान्यावर कोणतीही कारवाई प्रशासनाकडून होताना दिसत नाही. म्हणून मी आज महापालिका आयुक्त तसेच पोलीस आयुक्त या दोघांना देखील चौकशी करण्यासंदर्भात मागणी केली आहे. पोलीस आयुक्तांना ही विनंती असेल की लवकरात लवकर आपण चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करावा जेणेकरून शहरांमध्ये पुन्हा अशा घटना घडणार नाहीत. असही तुषार कामठे म्हणाले आहेत.

# सत्तेत सहभागी झाल्यावर मालिकांचा जामीन!

## सुषमा अंधारे यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नवाब मलिक यांचा राजीनामा घ्यावा, अशी महाविकास आघाडीकडे मागणी करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राठोड यांचा राजीनामा का घेतला नाही. मलिक अल्पसंख्यांक असल्यामुळे फडणवीस यांची भूमिका बदलली का, अशी विचारणा ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी येथे शुक्रवारी केली.

भ्रष्टाचाराचे आरोप असलेले नवाब मलिक यांनी अजित पवार गटाला समर्थन दिल्याचे विधिमंडळाच्या अधिवेशनात दिसून आले होते. त्याचे तीव्र राजकीय पडसाद उमटले. त्यानंतर सत्तेपेक्षा देश महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीमध्ये मलिक नकोत, असे पत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना दिले. या पार्श्वभूमीवर अंधारे यांनी पत्रकार परिषदेत फडणवीस यांच्यावर टीका केली. फडणवीस यांना उशिरा विवेकवाद कसा आठवला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अजित पवार आणि नवाब मलिक यांच्यामध्ये दोन ते तीन भेटी झाल्या होत्या. मात्र मलिक यांचा विषय काढण्यामागील राजकारण वेगळे आहे. अधिवेशनात मराठा आरक्षण, धनगर आरक्षणावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. मात्र मलिक प्रकरणावर पुढील तीन ते चार दिवस चर्चा होईल. सत्तेपेक्षा देश मोठा, हा विवेकवाद फडणवीस यांना उशिरा सुचला आहे. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रिफ यांची निर्दोष मुक्तता झालेली नाही. तरीही ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर आहेत. मनोज कंबोजसारखी व्यक्ती पुढे केली जाते. त्यावेळी फडणवीस यांचा विवेकवाद कुठे जातो, अशी टीका अंधारे यांनी केली. ससूनमधील अमली पदार्थ तस्करी प्रकरणी काहींना अटक झाली आहे. कारागृहातून या अवैध कृतीला बळ दिले जात होते. त्यामुळे कारागृह निरीक्षक, महानिरीक्षक यांच्यावर सरकारने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. संदर्भात उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना (अक्षशीं




झुरुअॅ) पत्र लिहिलं. त्यानंतर राजकीय वर्तुळात एकच खबळ माजल्याचं पाहायला मिळालं. याच संदर्भात ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी फडणवीसांवर हल्लाबोल केला. मलिक अल्पसंख्यांक असल्यामुळे ही भूमिका घेतली का असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केलाय. हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली यामध्ये जनतेच्या प्रश्नावर चर्चा होईल अशी अपेक्षा होती, पण चर्चा मात्र वेगळ्याच विषयाकडे वळवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिलीये. मलिकांनी पाठिंबा जाहीर केलाय. सत्तेत सहभागी झाल्यावर मालिकांचा जामीन झाला आहे, हे विशेष आहे असा आरोप देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. मालिकांचा राजीनामा घेतला नाही असं आमच्यावर आरोप करणाऱ्या फडणवीसांनी संजय राठोड यांचा राजीनामा घेतला का असा सवाल देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. वाब मलिक अल्पसंख्याक आहे म्हणून काल हा विषय काढण्यात आला का असा घणाघाती प्रश्न सुषमा अंधारेंनी उपस्थित केलाय. काल हा विषय काढण्यामागे राजकारण वेगळं आहे. आता पुढील तीन दिवस अधिवेशनात याच मुद्द्यावर चर्चा केली जाणार. कोट्यावधी रुपये खर्च करुन अधिवेशन पार पडत असतं. त्यामुळे मराठा आरक्षण, धनगर आरक्षण यावर चर्चा होण्याची गरज होती, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. त्तेपेक्षा देश मोठा हा विवेकवाद फडणवीस यांना उशीरा का सुचला. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल पटेल, मुश्रीफ यांची निर्दोष मुक्तता झाली आहे का? तरी ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर कसे?कंबोज सारखा आरोपी माणूस बोलायला पुढे करता. तुमचा विवेकवाद कुठे गेला असा प्रश्न उपस्थित करत सुषमा अंधारे यांनी फडणवीसांवर टीकास्त्र सोडलं.

### नेक्सस कधी बाहेर येणार आहे?

**» सत्तेत सहभागी झाल्यावर मलिकांचा जामीन झाला आहे, हे विशेष आहे असा आरोप देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. मलिकांचा राजीनामा घेतला नाही असं आमच्यावर आरोप करणाऱ्या फडणवीसांनी संजय राठोड यांचा राजीनामा घेतला का असा सवाल देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. वाब मलिक अल्पसंख्याक आहे म्हणून काल हा विषय काढण्यात आला का असा घणाघाती प्रश्न सुषमा अंधारेंनी उपस्थित केलाय. देश मोठा हा विवेकवाद फडणवीस यांना उशीरा का सुचला. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल पटेल, मुश्रीफ यांची निर्दोष मुक्तता झाली आहे का? तरी ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर कसे?कंबोज सारखा आरोपी माणूस बोलायला पुढे करता.**

मरसाळे, देवकाते अटक झाली. ठाकूरही शेवटची कडी नाही. कारागृहातून या गोष्टी चालतात. कारागृह निरिक्षक, महानिरीक्षक यांच्यावर काय कारवाई करणार हे सांगावे. तसेच ड्रग्सचं नेक्सस कधी बाहेर येणार आहे याबाबत देखील माहिती द्यावी, अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारेंनी दिली. अनिक्षा जयसिंघानि प्रकरणात अमृता फडवणीस यांची चौकशी लावणार का? असा सावल देखील यावेळी सुषमा अंधारे यांनी उपस्थित केलाय.

# बीआरटी'ला स्वत: नष्ट केल्याबद्दल पालिकेचे अभिनंदन!

## संतप्त पुणेकरांची, स्वयंसेवी संस्थांची प्रशासनावर जळजळीत टीका

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

जागतिक पातळीवर शाश्वत वाहतूक पुरस्कार मिळविणारी, पर्यावरण संवर्धनाचा पुरस्कार करणारी महापालिका अशी पुणे महापालिकेची खास ओळख. याच महापालिकेने केंद्र सरकारच्या पैशातून ''बीआरटी' उभारली, या बीआरटीवरच्या नावावर अनेक पुरस्कार मिळविले, त्यासाठीचे सत्कार, हारतुरे स्वीकारले. आता मात्र त्याच बीआरटीला स्वतःच्या हाताने नष्ट करणारी महापालिका म्हणून यापुढे पुणे महापालिका ओळखली जाईल, या नवीन बिरूदाबद्दल महापालिका प्रशासनाचे अभिनंदन ! आता जागतिक शाश्वत वाहतूक पुरस्कार, राहण्यायोग्य उत्तम शहर, असे मिळालेले पुरस्कार, त्याच आवेशात परत कराल का ? अशा खोचक शब्दात महापालिका प्रशासनाकडून बीआरटी मार्गिका काढण्याच्या गैरकारभारावर पुणेकरांनी आपला संताप व्यक्त केला आहे. महापालिका प्रशासनाने बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास अचानक नगर रस्त्यावरील दीड किलोमीटरपेक्षा जास्त बीआरटी मार्गिका काढून टाकला. महापालिका अधिकाऱ्यांच्या या गैरकारभाराबद्दल पुणेकरांनी संताप व्यक्त करण्यास सुरवात



केली. वास्तुविशारद व वाहतूक नियोजक प्रांजली देशपांडे, पादचारी प्रथमचे प्रशांत इनामदार, परिसर संस्थेचे रणजित गाडगीळ, पर्यावरण शिक्षण केंद्राच्या संस्कृती मेनन यांनी नगर रस्त्यावरील बीआरटी काढण्याच्या महापालिकेच्या कृतीवर खरमरीत पत्र लिहून त्यांचा निषेध नोंदविला आहे. बीआरटीने सार्वजनिक वाहतुकीला उत्तेजन दिले. मात्र महापालिकेच्या अधिकाऱ्यांना बीआरटीतून प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांपेक्षा, खासगी वाहनचालकांना होणारा त्रास अधिक जाणवला. अखेर महापालिकेचे हुशार प्रशासक खासगी वाहनचालकांच्या आवाजाला बळी पडल्याचा खेद वाटतो. त्याऐवजी बीआरटी संपविण्याचा आत्मघातकी मार्ग आपण निवडला, हे पुणेकरांचे दुर्दैव, असे पत्रात नमूद केले आहे. 'सेव्ह पुणे ट्रॅफिक मूव्हमेंट'चे संचालक हर्षद अभ्यंकर म्हणाले, 'विद्यार्थी नापास होतो, परिक्षा नाही. बीआरटीच्या परिक्षेत इतर शहरे पास झाली, पण आपल्याकडे त्याची अंमलबजावणी केली नाही. प्रशासकांमुळे पुणे बीआरटी नापास झाली.'

वाहतुकीचा अभ्यास नसलेल्यांनी केला अहवाल, कंत्राट देण्यासाठी घाईगडबड

महापालिकेने वाहतूक धोरण, विकास आराखडा बाजूला सारून वाहतुकीचा अभ्यास नसलेल्या संस्थेकडून नगर रस्ता बीआरटी मार्गिकेबाबतचा अहवाल मागविला. अहवाल प्राप्त झाल्यानंतर बीआरटी मार्गिका काढण्याचे कंत्राट देण्याच्या आनंदात महापालिका प्रशासनालाही अहवाल दाखविण्याचे कष्ट महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी घेतले नाहीत.जे प्रवासी खासगी वाहनांऐवजी बसने प्रवास करून वाहतूक कोंडी कमी करतात, त्यांचाच आपण विश्वासघात केलात, तुमच्या या खेळात पुण्याला मात्र कित्येक वर्ष मागे नेऊन ठेवल्याची तिखट टीका स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींनी केली आहे.

# लहान मुलांसाठी रस्ता सुरक्षा कार्यशाळा!

## पुणे : शंभर वर्षांचा लक्ष्मी रस्ता येत्या सोमवारी फक्त पादचाऱ्यांसाठी!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्ता सोमवारी (११ डिसेंबर) वाहनविरहित ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौकादरम्यान पादचाऱ्यांना विना अडथळा चालता येणार आहे. पादचाऱ्यांच्या सुविधेसाठी महामेट्रोकडून डेक्कन मेट्रो स्थानक ते महापालिका भवन स्थानक या दरम्यान सायकली उपलब्ध करून देण्यात येणार असून, पीएमपीकडून ज्यादा गाड्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पादचाऱ्यांना विनाअडथळा चालता यावे, यासाठी वाहन



चालकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. महापालिकेच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून ११ डिसेंबर रोजी पादचारी दिन आयोजित केला जात आहे. पादचारी दिन साजरा करणारे पुणे देशातील पहिले शहर ठरले आहे. पादचारी दिनानिमित्त यंदाही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबाबतची माहिती पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. वाहतूक पोलीस, लक्ष्मी रस्ता व्यापारी संघटना आणि पथारी संघटनेच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. लक्ष्मी रस्त्यावरील नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौक आकर्षक पद्धतीने सजविण्यात येणार आहे. शहराच्या विविध भागात पदपथांची देखभाल दुरुस्ती करून पादचाऱ्यांना पदपथावरून विनाअडथळा चालता येईल, अशी व्यवस्था केली जाणार आहे. शहरातील शंभर महत्त्वाच्या चौकांत पादचारी सुरक्षेबाबत उपाययोजना केल्या जात आहेत. या दिवशी लोकप्रबोधनासाठी आणि नागरिकांच्या करमणुकीसाठी विविध कार्यक्रम केले जातील. सामान्य नागरिकांनाही कला सादर करण्याची संधी मिळणार असून 'वॉकिंग प्लाझा'चे व्यासपीठ त्यांच्यासाठी खुले राहणार आहे. महापालिका अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन नागरिकांना सादरीकरण करता येणार आहे, अशी माहिती पावसकर यांनी दिली. लक्ष्मी रस्त्याला नुकतीच १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. या उपक्रमाच्या निमित्ताने या रस्त्याला नवे रूप येणार असून या दिवशी खासगी गाड्यांचा वापर करू नये, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### वाहतुकीत बदल

» लक्ष्मी रस्त्यावरील लिंबराज महाराज चौक ते गरुड गणपती मंडळ दरम्यानची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. लक्ष्मी रस्त्याने टिळक चौकाकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी लिंबराज महाराज चौकातून (सेवासदन चौक) टिळक चौकाकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी सेवासदन चौकातून उजवीकडे वळावे. तेथून बाजीराव रस्त्यावरून इच्छितस्थळी जावे. कुमठेकर रस्त्याने लक्ष्मी रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी चितळे बंधू मिठाईवाले दुकानाजवळून डावीकडे वळून बाजीराव रस्त्याने इच्छितस्थळी जावे. रमणबाग चौकातून उंबऱ्या गणपती चौकाकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी लक्ष्मी रस्त्याकडे न जाता. केळकर रस्त्याने टिळक चौकाकडे जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्याकडून स्थानिक राजकीय नेत्यांचा छळ

## सर्वपक्षीय नेत्यांची व्यंकटेश दुर्वास यांच्याकडे तक्रार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जेजुरी नगरपालिकेत केंद्राच्या एका योजनेच्या कामासाठी कंत्राटी पद्धतीने भरती झालेल्या अधिकाऱ्याचा दबदबा असल्याचे समोर आले आहे. नगरपालिकेच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांकडून आरोग्य व स्वच्छता विभागाचा कार्यभारही या अधिकाऱ्यालाच मिळाला होता. या अधिकाऱ्याच्या मनमानीला सर्वपक्षीय स्थानिक नेतेही कंटाळले आणि त्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून नगरपालिका शाखेकडे तक्रारच केली. त्यानंतर या अधिकाऱ्यामागे चौकशी लावण्यात आली आहे. जेजुरी नगरपालिकेत राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाच्या कामासाठी कंत्राटी पद्धतीने बाळासाहेब बगाडे या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. या योजनेअंतर्गत काम करणाऱ्यांना या योजनेशिवाय अन्य कामे करता येत नाहीत. मात्र, नगरपालिकेच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी बगाडे यांच्याकडे आरोग्य व स्वच्छता विभागाचा कार्यभार दिला. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना आणि आरोग्य विषयक तक्रारी घेऊन येणाऱ्या नागरिकांना त्रास देणे, नागरिकांची अडवणूक करणे, ठेका पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन रोखणे, महिला बचत गटाच्या कर्जवाटपात अनियमितता विविध तक्रारी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आल्या. स्थानिक नेत्यांनाही हा अधिकारी जुमानेना. त्यामुळे भाजपच्या जिल्हा प्रभारी अलका शिंदे, माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार, शिवसेनेचे सोहम स्वामी, मनसेचे उमेश जगताप, राष्ट्रवादीचे एन. डी. जगताप, संभाजी ब्रिगेडचे संदीप जगताप, उद्योजक प्रशांत लाखे आदी सर्वपक्षीय नेत्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून नगरपालिका शाखेचे सहआयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्याकडे तक्रार केली. या तक्रारींची दखल घेऊन दुर्वास यांनी तातडीने बगाडे यांच्याकडील आरोग्य व स्वच्छता विभागाचा कार्यभार काढून घेतला. तसेच विद्यमान मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांना या तक्रारींच्या अनुषंगाने विस्तृत अहवाल देण्याचे आदेश दिले. 'नगरपालिकेत मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे कदाचित आधीच्या मुख्याधिकाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरुपात पदभार दिल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, स्थानिक सर्वपक्षीय नेते आणि नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार बगाडे यांना स्वच्छता व आरोग्य विभागाचा कार्यभार कोणत्या तरतुदींच्या आधारे, कोणाच्या मान्यतेने देण्यात आला. याबाबत खुलासा आणि अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. अहवाल आल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याशी चर्चा करून पुढील कार्यवाही करू,' असे दुर्वास यांनी सांगितले.